


एका सुंदर दिवशी

लेखिका: नन्नी होग्रोगियन



एका सुंदर दिवशी

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



एका सुंदर दिवशी एक कोल्हा एका घनदाट जंगलातून चालला होता.

जंगलाच्या दुसऱ्या टोकाला पोहोचला तेव्हा कोल्ह्याला खूप तहान लागली.



एका वृद्ध स्त्रीने ठेवलेली दुधाची बादली त्याला तिथे दिसली.

ती स्त्री जळणासाठी लाकूड गोळा करत होती. तिला कोल्हा दिसेपर्यंत कोल्ह्याने बादलीतील सारे दूध पिऊन टाकले.






वृद्ध स्त्री एवढी रागावली की तिने आपला चाकू काढला आणि कोल्ह्याचे शेपूट हातात पकडून कापून टाकले. मग कोल्हा रडू लागला.

“प्लीज, आजीबाई, माझं शेपूट परत होत्या त्या जागेवर शिवून टाका. नाहीतर माझे सगळे मित्र माझ्यावर हसतील.”

“आधी माझं दूध परत दे,” ती म्हणाली. “मगच तुझं शेपूट शिवून देईन.”



मग कोल्हा डोळे पुसून एक गाय शोधायला निघाला.

“गायमाते,” त्याने गायीला आर्जव केले, “प्लीज, मला थोडंसं दूध दे. मी ते आजीबाईंना देईन. मग ती माझं शेपूट परत जागेवर शिवून टाकेल.”

गाय उत्तरली, “मला थोडं गवत आण. मग मी दूध देईन.”



कोल्हा शेताकडे गेला, “अरे, गवताळ शेता, मला थोडं गवत दे. मी ते गायीला देईन आणि ती मला दूध देईल. मी ते दूध आजीबाईंकडे घेऊन जाईन. मग ती माझं शेपूट परत जागेवर शिवून टाकेल आणि मी माझ्या मित्रांकडे परत जाऊ शकेन.”

शेत म्हणाले, “आधी मला पाणी आणून दे.”



कोल्हा पळतच झऱ्याकडे गेला आणि त्याला पाणी देण्याची विनंती केली. झरा म्हणाला, “मला एक जग आणून दे.”



कोल्ह्याला एक सुंदर मुलगी दिसली. “गोड मुली,” तो म्हणाला.


“प्लीज, मला तुझा जग दे. मग मी शेतासाठी पाणी घेऊन जाऊ शकेन. शेत मला गायीला खायला गवत देईल. गाय मला आजीबाईंसाठी दूध देईल. आजीबाई माझं शेपूट परत जागेवर शिवून टाकेल. मग मी माझ्या दोस्तांकडे परत जाऊ शकेन.”

मुलीने स्मित केले. “तू मला निळा मणी घेऊन आलास, तर मी तुला माझा जग देईन,” ती म्हणाली.



कोल्ह्याला एक फेरीवाला दिसला. तो त्याला म्हणाला, “खालच्या रस्त्याला एक सुंदर मुलगी उभी आहे. तू मला एक निळा मणी दिलास तर ती तुझ्यावर खुश होईल आणि माझ्यावरसुद्धा! मग ती मला तिचा जग देईल. त्यातून मी शेताला पाणी घेऊन जाईन. मग शेत मला गायीसाठी गवत देईल आणि गाय मला दूध देईल. ते दूध आजीबाईंना दिल्यावर ती माझं शेपूट परत जागेवर शिवून टाकेल.”

पण कोल्ह्याच्या चतुर संभाषणाचा आणि स्मितहास्याचा फेरीवाल्यावर काहीच परिणाम झाला नाही. तो म्हणाला, “मला एक अंड आणून दे. मग मी तुला मणी देईन.”



मग कोल्हा पळत एका कोंबडीकडे गेला.


“कोंबडीताई, लाडक्या कोंबडीताई, प्लीज, मला एक अंड दे. मी ते फेरीवाल्याला देईन. मग फेरीवाला मला निळा मणी देईल. मग मुलगी मला जग देईल. मग झरा मला पाणी देईल. मग शेत मला गवत देईल. मग गाय मला दूध देईल. मग आजीबाई माझं शेपूट परत जागेवर शिवून टाकेल.”

कोंबडी म्हणाली, “आधी मला थोडे दाणे आणून दे.”




कोल्हा निराश होऊ झाला, चक्कीवाल्याकडे पोहोचताच रडू लागला.


“दयाळू चक्कीवाल्या, प्लीज, मला थोडे दाणे दे. मी ते कोंबडीला देईल आणि ती मला अंड देईल. अंड घेऊन फेरीवाला मला मणी देईल. मणी घेऊन मुलगी मला जग देईल. त्यातून मी शेतासाठी पाणी घेऊन जाईन आणि शेत मला गवत देईल. गवत घेऊन गाय मला दूध देईल. दूध घेऊन आजीबाई माझं शेपूट परत जागेवर शिवून टाकेल, नाहीतर सगळे मित्र मला हसतील.”




चक्कीवाला एक भला माणूस होता. त्याला कोल्ह्याची दया आली. त्याने कोल्ह्याला कोंबडीसाठी थोडे दाणे दिले. मग कोंबडीने कोल्ह्याला एक अंड दिले. मग फेरीवाल्याने त्याला एक मणी दिला.



मग मुलीने कोल्ह्याला जग दिला. त्यातून पाणी घेऊन कोल्हा शेताकडे गेला. शेताने त्याला गवत दिले. ते घेऊन गायीने त्याला दूध दिले.



कोल्ह्याने ते दूध वृद्ध स्त्रीला दिले. मग तिने कोल्ह्याचे शेपूट काळजीपूर्वक त्याच्या अंगावर शिवून टाकले.



त्यानंतर कोल्हा जंगलाच्या दुसऱ्या टोकाला आपल्या मित्रांना भेटायला पळाला.



समाप्त